आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६

ठळक बातम्या

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपन्न; दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या ९ मार्चपर्यंत स्थगित.
- सेवा तीर्थ तसंच कर्तव्य भवन-१ आणि २ चं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन.
- रेडियो दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम.
- लोहारडोंगरी खाण प्रकल्पाला सर्वांचा विरोध असल्याचं भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांचं प्रतिपादन.

संसद

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याच्या कामकाजाचा आज अखेरचा दिवस होता. आजच्या दिवशीही लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्यानं कामकाज स्थगित करण्यात आलं असून दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्चला सुरू होणार आहे. लोकसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासानंतर काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डीएमकेसह अन्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केल्यानं कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित झालं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यावरही गदारोळ सुरूच राहिल्यानं पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित केलं. राज्यसभेतही अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राच्या अखेरच्या दिवशी सदस्यांनी विविध दस्तऐवज सभागृहाच्या पटलावर मांडले. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रपतींचा संदेश सभागृहात वाचून दाखवला. २८ जानेवारी रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनात केलेल्या अभिभाषणाबद्दल राज्यसभेच्या सदस्यांनी व्यक्त केलेल्या आभारदर्शक प्रस्तावाची नोंद राष्ट्रपतींनी घेतल्याचं संदेशात नमूद केलं. त्यानंतर राज्यसभेचंही कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राहुल गांधी

लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची आज संसदभवन परिसरात भेट घेतली. या भेटीत अमेरिकेबरोबरच्या व्यापारिक कराराला विरोध करण्यासाठी तसंच शेतकरी आणि शेतमजूरांच्या सुरक्षेबाबत राष्ट्रीय पातळीवर आंदोलन करण्याबाबत चर्चा झाली. अमेरिकेबरोबर केल्या जाणाऱ्या व्यापार करारामुळे देशात परदेशी कृषी माल आयातीला परवानगी दिली असून, याचा भारतीय कृषी उद्योगावर विपरीत परिणाम होणार असल्याचं राहुल गांधी यांनी यावेळी सांगितलं. अमेरिका- भारत यांच्यात कृषी क्षेत्राबाबतच्या कराराला शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनीही तीव्र विरोध दर्शवला आहे.

<u>सेवा तीर्थ- पंतप्रधान</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिल्ली इथल्या सेवा तीर्थ या इमारतीच्या संकुलाचं नाव जाहीर केलं. मोदी यांनी सेवा तीर्थ आणि कर्तव्य भवन-१ आणि २ चं औपचारिक उद्घाटन केलं. सेवा तीर्थमध्ये पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय, कॅबिनेट सचिवालय आहे. ही सर्व कार्यालयं पूर्वी वेगवेगळ्या ठिकाणी होती. नवीन इमारत संकुल आधुनिक स्वरूपाचं असून तिथे यापुढील सर्व प्रशासकीय कार्ये एकत्रितपणे केली जातील.कर्तव्य भवन-१ आणि २ मध्ये अर्थ, संरक्षण, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, शिक्षण मंत्रालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालय यासह अनेक प्रमुख मंत्रालयं समाविष्ट आहेत. या इमारतींमध्ये स्मार्ट ॲक्सेस कंट्रोल सिस्टीम, दक्षता ठेवणारे नेटवर्क आणि प्रगत आपत्कालीन प्रतिसाद सुविधा यासारख्या व्यापक सुरक्षांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज प्रधानमंत्री राहत योजनेला मंजुरी दिली. या निर्णयामुळे लखपती दिदींसाठीचं लक्ष्य दुप्पट करून **6** कोटी रु. केलं, कृषी पायाभूत सुविधा निधी दुप्पट करून **2** लाख कोटी रु. केला आणि स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंड्स **2** साठी **10,000** कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. प्रधानमंत्री राहत योजनेअंतर्गत, अपघातग्रस्तांना योजनेअंतर्गत **1.5** लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळू शकतील. यासोबतच सरकारनं **30** दशलक्ष लखपती दिदी निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे. हे उद्दिष्ट अंतिम मुदतीच्या एक वर्ष आधीच साध्य झालं आहे. पंतप्रधानांनी मार्च २०२९ पर्यंत ६ कोटी लखपती दिदींचं नवीन महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवलं आहे.

<u>सुधीर मुनगंटीवार</u>

चंद्रपूर जिल्हयातल्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्राजवळ प्रस्तावित लोहारडोंगरी खाण प्रकल्पाला सर्वांचाच विरोध असल्याचं भाजप आमदार सुधीर

मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. पर्यावरणाला किमान हानी पोचेल, अशा पद्धतीनं हा खाण प्रकल्प राबवण्यासाठी राज्य वन्यजीव मंडळानं परवानगी दिली असली, तरी यासंबंधी अंतिम निर्णय उच्च न्यायालयच घेईल, असं मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे राज्य सरकार या प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवणार नाही, असं त्यांनी सांगितलं आहे.

वीज उपकेंद्र भूमिपूजन

गोंदिया जिल्ह्यातील देवरी इथं **132** के.व्ही. वीज उपकेंद्राच्या उभारणीसाठी भूमिपूजन सोहळा आज संपन्न झाला. या प्रकल्पामुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम होणार असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार तथा माजी पालकमंत्री परिणय फुके, आमदार संजय पुराम, जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी यांच्या उपस्थितीत हा भूमिपूजन सोहळा पार पडला.

महाशिवरात्र

रामरोटी अन्नदान प्रतिष्ठान पारडसिंगा आणि पालखी सोहळा सेवा समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानं महाशिवरात्रीनिमित्त परमश्रेष्ठी अनसुया माता पालखी सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. नागपूर ते पारडसिंगा या पालखी सोहळ्याला आज सकाळी लाकडीपूल इथून सुरुवात करण्यात आली. जागोजागी या पालखी सोहळ्याचं स्वागत करण्यात येत आहे. पालखीमध्ये महिला भजन मंडळ, बँड पथक आणि नागरिक सहभागी झाले असून **15** फेब्रुवारी रोजी ही पालखी कळमेश्वर, काटोल मार्गे पारडसिंगा इथं दाखल होईल.

रेडिओ दिन

आजचा १३ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी 'रेडिओ दिवस' म्हणून साजरा केला जातो. स्पॅनिश रेडियो अकादमीच्या विनंतीवरून नोव्हेंबर २०११ मधे युनेस्कोनं हा निर्णय घेतला आणि डिसेंबर २०१२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेनं त्यावर मोहोर उमटवली. "कृत्रिम बुद्धिमत्तेचा या माध्यमातला वापर हे फक्त साधन राहील, ते मानवी आवाजाची जागा घेऊ शकणार नाही," अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे. सार्वजनिक प्रसारण सेवेत ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाचं माध्यम म्हणून आकाशवाणी गेली अनेक वर्ष चोख कामगिरी बजावत आहे. आकाशवाणीच्या वतीनं

छत्तीसगडमध्ये रायपूर इथं आज जागतिक रेडिओ दिन परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रेडिओ हे दूरदूरच्या गावांपासून शहरांतल्या लोकांपर्यंत आवाज पोहचवण्याचं माध्यम असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

## महा कृषी विस्तार ॲप

बुलढाण्यात बहुतांशी शेती ही कोरडवाहू असल्यानं कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षण यामुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न हे बेभरवशाचं झालं होतं. मात्र कृषी विभागाच्या ए. आय तंत्रज्ञानानं विकसित झालेल्या महा कृषी विस्तार ॲपमुळे शेतकऱ्यांना कृषी तज्ञाचा योग्य सल्ला मिळत आहे. बाजारभाव तसेच कृषी विभागाच्या योजनांची मोबाईलवर माहिती या ॲपमुळे मिळत असल्यानं शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ लागला असल्याचं स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितलं-

## हेल्पलाईन

जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणी ही प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यातील महत्त्वाची कायदेशीर प्रक्रिया आहे. या नोंदणीबाबत नागरिकांना अचूक आणि सविस्तर माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी आरोग्य सल्ला केंद्रामार्फत १०४ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये आणि त्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळावं, यासाठी ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## महावितरण

महावितरणच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोचवणं, वीज चोरी विरोधात वातावरण निर्मिती करणं, वीज ग्राहकांमध्ये स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत जनजागृती निर्माण करणं, वीज अपघात टाळणं, या उद्देशानं यवतमाळ शहरासह महावितरणच्या जिल्ह्यातील १९ उपविभागात आज दीर्घ पदयात्रा काढण्यात आली. महावितरणमध्ये ९ ते २३ फेब्रुवारी या काळात स्मार्ट मिटर पंधरवडा राबविण्यात येत आहे. या पंधरवड्याचा भाग म्हणून आज अमरावती परिमंडळात जनजागृती पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

## रोजगार मेळा

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अंतर्गत मॉडेल करिअर सेंटर आणि सिक्युरिटी अँड इंटेलिजन्स सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमानं दिनांक २२ फेब्रुवारी रोजी यवतमाळ जिल्ह्यातील नेर इथं क्रीडा संकुल परिसरात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार भरती अभियानाचं आयोजन करण्यात आलं आहे. या भरती अभियानाअंतर्गत सुरक्षा जवान पदासाठी ३०० जागा असून किमान दहावी उत्तीर्ण उमेदवार पात्र असतील. उमेदवारांचं वय १९ ते ४० वर्षे दरम्यान असावं. इच्छुक उमेदवारांनी दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता उपस्थित रहावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

माहूरगड परिषद

नांदेड जिल्ह्यातील माहूरगड इथं येत्या १५ फेब्रुवारी रोजी शेतकरी संघटनेतर्फे कृषी तंत्रज्ञान-पिकांची व्यापार परिषद आयोजित करण्यात येत आहे. या परिषदेत शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर चर्चा केली जाणार आहे. परिषदेत पीक विमा, कर्जमाफी, शेतकरी कल्याणकारी योजना आणि शेतीमालाला मिळणारा दर या प्रमुख मुद्द्यांवर भूमिका ठरवली जाणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी शिंदे-उंचेगावकर यांनी दिली.

अपघात

अकोला शहरातील वाशिम बायपास रोडवर पेट्रोल पंपासमोर आज सकाळी मॅक्झिमो आणि दुचाकी वाहनामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. अपघातात निखिल विश्वनाथ ताजाने या इसमासह त्याच्यासोबत असलेल्या एका महिलेचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर मॅक्झिमो चालक घटनास्थळावरून फरार झाल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं.

*****